PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Chintoo-2
Year: 2013

Song: Aatpaat Gaon Hot
Lyricist: Shrirang Godbole

आटपाट गाव होतं
शुर तिथं राजा
दाही दिशा डंका त्याचा
मोठा गाजावाजा
हो आटपाट गाव होतं
शुर तिथं राजा
दाही दिशा डंका त्याचा
मोठा गाजावाजा
सुखामध्ये होती प्रजा
पक्षी गाती गाणी
दुःखामध्ये मातूर होती
राजाची ती राणी
कारण तिच्या पोटी नव्हतं रं मुल बाळ
दिन रात राणीला खायाला उठं काळ
राणी म्हणाली
सवत माझी आणा
तुम्ही करा दुसरं लगीन
तिला होईल पोर
तेव्हा सुखानी मी मरीन
हो तिला होईल पोर
तेव्हा सुखानी मी मरीन
राजा म्हणाला
दुसरी तिसरी नको मला
तुच माझी राणी
उगी येऊ देऊ नको
डोळ्याला गं पाणी
उगी येऊ देऊ नको
डोळ्याला गं पाणी
राजा आणि राणीची
ही खोल खोल व्यथा
राजा आणि राणीची
ही खोल खोल व्यथा
ऐका हो ऐका ऐका
खजिन्याची चित्तरकथा
ऐका हो ऐका
खजिन्याची चित्तरकथा
ऐका हो ऐका
खजिन्याची चित्तरकथा
हो ऐका हो
खजिन्याची चित्तरकथा
वाळाजा शाकान ठीसा
वाळाजा शाकान ठीसा
वाळाजा शाकान ठीसा
वाळाजा शाकान ठीसा
एक दिवस राजाकडं घुबड आलं
कोण
घुबड
घुं घुं करत त्यानं राजाला सांगितलं
ओ राजा तुझी प्रजा सारी
आळशी झाली फार
खायला समदी काळ
अन् भुईला झाली भार
तू झालास म्हातारा
न तुला पोर बाळ
तू गेल्या नंतर हे
असेच बसून राहतील
आळशी गोळे तुझे धन
वाटून वाटून खातील

आळशी गोळे तुझे धन
वाटून वाटून खातील
राजा पडला विचारात
करू तरी काय
या प्रश्नाचं उत्तर मला
काही सुचत नाय
काय करू कसं करू
काय करू कसं करू
राणी म्हणाली
माझा दादा लई हूशार
बुध्दी त्याची भारी
खजिना लपवून ठेवायाची
शक्कल काढंल न्यारी
तो शक्कल काढंल न्यारी
तो शक्कल काढंल न्यारी
वाट कसली बघताय मग
लागलीच त्याला बोलवा
असशील तसा निघून ये
धाडा हो सांगावा
निरोप घेऊन पक्षी गेला
शंभर कोस दूर
घोडा घेऊन भाऊ आला
होऊन चिंतातूर
दादा ये जरा दम खा
हे घे गुळ पाणी
आता ऐक
ऐक त्यांच्या तोंडून त्यांची कहानी
वापर तुझी बुध्दी सारी
खजिना माझा दडव रे
सहज नाही गावणार कुणा
असं काही घडव रे

ज्याच्या ठाई बुध्दी
अंगी धाडस त्याच्या असंल
त्यालाच फक्त खजिन्याची
अवघड वाट दिसंल
ऐरा गैरा पापी लोभी
जाईल तिच्या वाटे
वाटंवरती पसरव त्याच्या
जहरी मोठे काटे
नाठाळाला बसंल काठी
खोट्यासाठी सोटा
नाठाळाला बसंल काठी
खोट्यासाठी सोटा
ऐका हो ऐका
खजिन्याची चित्तरकथा
ऐका हो ऐका
खजिन्याची चित्तरकथा
भाऊ म्हणाला
असं काही जंतर मंतर
तंतर भारी करतो
कोण काढील शोधून
त्याची परिक्षा मी बघतो
देवाच्या जो दारी येईल
त्याला घंटा दिसेल
वाजवेल तोच
ज्याच्या अंगी धाडस असेल
नियतीच्या जबड्यातून
नशीब ओढून काढेल
गोलामधला अर्धा गोल
डोक्याने जो फोडेल
त्याच्या गळ्यात पडेल माळ
सापडतील सूर

PlanetRead

Literacy for a Billion

अंधारातून प्रकाशात
बदलेल सारा नूर
अवघड वाट सोपी होईल
सुटता पुढचे कोडे
बुध्दी आणि देहाला
मग कष्ट पडतील थोडे
मोठं कुलूप दिसेल आणि
मोठी किल्ली दिसेल
छोट्या मेंदूपेक्षा मोठी
दुसरी किल्ली नसेल
ज्याला समजेल फिरवून कळ
तोच जाईल आत
बुध्दिबळाला धाडसाची
मिळेल पुरती साथ
आधी चालेल घोडा पाच
मग उंट सहा
नंतर चार पावले हत्ती
समोर येईल रंगीत बत्ती
बत्तीमध्ये कागद कोरा
आता काय करशील पोरा
आता काय करशील पोरा
आता काय करशील पोरा
वाळाजा शाकान ठीसा
वाळाजा शाकान ठीसा
वाळाजा शाकान ठीसा

ज्यांना सुटेल सारे कोडे
मिळतील गोठ पैंजण तोडे
हिरे माणिक पाचू मोती
ह्यांना नाही कुठली गिणती
हडपे हडपे चांदी सोने
रांजण रांजण दागदागिने
पाहून पाहून डोळे दिपतील
मोजून मोजून हात दुखतील
ज्याला सगळं मिळेल
त्याला पृथ्वीवरला कुबेर म्हणतील
कुबेर म्हणतील
कुबेर म्हणतील
रजा घेतो एवढं सांगून
आम्ही जाता जाता
रजा घेतो एवढं सांगून
आम्ही जाता जाता
संपली हो संपली
खजिन्याची चित्तरकथा
संपली हो
खजिन्याची चित्तरकथा
हो संपली हो
खजिन्याची चित्तरकथा
संपली हो
खजिन्याची चित्तरकथा
हो थांबा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*